संस्थापक
साने गुरुजी

साप्ताहिक
साधना
Weekly Sadhana

Date of Issue
शनिवार,
23 मे 2026
मूल्य रु. 50
(एकूण पृष्ठे : 48)

सोमनाथ मंदिर पुनर्निर्माण, प्राणप्रतिष्ठा आणि तर्कतीर्थ भूमिका
सुनीलकुमार लवटे

जुगलबंदी सात राजकीय भागीदाऱ्या
रामचंद्र गुहा

भारतीय मुस्लीम : दुय्यम नागरिक ठरण्याच्या उंबरठ्यावर
– नजीब जंग



More Newspaper and Magazines Telegram Channel join Search https://t.me/Magazines_8890050582 (Mob_+918890050582)

लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स व ऑक्सफर्ड मधून उच्च शिक्षण घेतलेल्या नजीब जंग यांनी, 1999 मध्ये वयाच्या पन्नाशीत असताना भारतीय प्रशासकीय सेवेतून निवृत्ती घेतली. 2009 ते 13 या काळात ते जामिया मिलिया इस्लामिया विद्यापीठाचे कुलगुरू राहिले. त्यानंतर 2013 ते 16 या काळात ते दिल्लीचे नायब राज्यपाल होते, 'आप' सरकारशी असलेल्या मतभेदांमुळे त्यांनी राजीनामा दिला होता. उदारमतवादी व पुरोगामी विचारवंत अभ्यासक अशी त्यांची ख्याती आहे. गेल्या आठवड्यात त्यांची व्हिडिओ मुलाखत करण थापर यांनी 'द वायर' साठी घेतली. या मुलाखतीला संदर्भ आहे तो आसाम व पश्चिम बंगाल राज्यांतील विधानसभा निवडणूक निकालांचा आणि तिथे झालेल्या मतदार नोंदणी व तपासणी कार्यक्रमांचा. त्यामुळे, ती मूळ इंग्रजी मुलाखत शब्दांकन व अनुवाद करून इथे प्रसिद्ध करीत आहोत.

मुस्लीम लोक दुय्यम नागरिक ठरण्याच्या उंबरठ्यावर

नजीब जंग

केंब्रीज व ऑक्सफर्ड मध्ये उच्च शिक्षण घेतल्यावर 1980 नंतरचे दशकभर इंग्लंडमध्ये टीव्ही पत्रकारिता करणाऱ्या करण थापर यांनी त्यानंतरची साडेतीन दशके भारतातील विविध माध्यमांसोबत काम केले आहे. या काळात त्यांनी देश विदेशातील नामवंतांच्या हजारो मुलाखती घेतल्या आहेत.

करण थापर : बंगालमधील लोकसंख्येत मुस्लिमांचं प्रमाण 27 टक्के आहे, तर आसाममध्ये 34 टक्के आहे. पण भारतीय जनता पक्षाने (भाजप) या राज्यांमधील विधानसभा निवडणुकांमध्ये एकही मुस्लीम उमेदवार दिला नाही. दुसरी गोष्ट, भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून पहिल्यांदाच केंद्र सरकारमध्ये एकही मुस्लीम मंत्री नाही आणि भाजपचा एकही मुस्लीम खासदार नाही. देशात इतरत्रही सार्वजनिक जीवनातून मुस्लिमांना बाजूला सारण्याचे प्रयत सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर आपले आजचे पाहुणे, जामिया मिलिया इस्लामिया विद्यापीठाचे माजी कुलगुरू आणि दिल्लीचे माजी उप-राज्यपाल नजीब जंग यांच्याशी मी संवाद साधणार आहे.

नजीब जंग, बंगालमधील मतदारयाद्यांमधील दुरुस्ती आणि आसाममधील मतदारसंघांची पुनर्रचना (परिसीमन / डिलिमिटेशन), या दोन्ही उपक्रमांचा त्या-त्या राज्यांमधील मुस्लिमांच्या राजकीय हितसंबंधांवर प्रमाणाबाहेर विपरीत परिणाम झाला. याचा अर्थ कसा लावायचा?

नजीब जंग : मुलाखतीला बोलावल्याबद्दल धन्यवाद. आपण चर्चेला घेतलेला मुद्दा केवळ मुस्लिमांसाठीच नव्हे तर संपूर्ण भारतासाठी महत्त्वाचा आहे. या संदर्भात केवळ बंगाल व आसाम इथल्या मुस्लिमांवरील परिणामाबद्दल बोलून पुरणार नाही. मला वाटतं, आपण भारतभरातील मुस्लिमांना या संदर्भात काय वाटतं याबद्दल बोलायला हवं. तुम्ही उल्लेख केलेल्या घडामोडींमुळे मुस्लिमांमध्ये मोठ्या प्रमाणात अस्वस्थता, चिंता आणि भीतीची भावना निर्माण झाली आहे.

मतदारयाद्यांमधील दुरुस्ती बऱ्याच काळापासून चिंतेचा विषय ठरली आहे. सखोल दुरुस्त्यांचा उपक्रम वेळोवेळी केला जातोच. त्यात काही अडचण नाही. पण या वेळी ज्या तऱ्हेने या दुरुस्त्या करण्यात आल्या, ते मात्र चिंतेचं होतं. मुस्लिमांना वगळण्याची भूमिका त्यामागे असल्याचं उघडच दिसतं. भारतात मुस्लिमांमध्ये आणि उदारमतवाद्यांमध्ये याबद्दल बरीच वादचर्चा होत राहिली

Date of Posting : 18-5-2026

More Newspaper and Magazines Telegram Channel join Search https://t.me/Magazines_8890050582 (Mob_+918890050582)

आहे. मतदारसंघांची पुनर्रचना याहून खूप जास्त धोकादायक आहे. याचा दाखला आपल्याला आसाममध्ये मिळालाच. मुस्लिमांचं संख्याबळ जास्त असेल तिथे त्यांचं मतदार म्हणून विभाजन करण्यासाठी, किंबहुना त्यांना एका बाजूला सारण्यासाठी या उपक्रमाचा उपयोग करण्यात आला आणि त्याचा परिणाम आपण बघतो आहोत.

प्रश्न – या दोन्हींबद्दल एक-एक करून बोलू. बंगालमध्ये मतदारयाद्यांमधील दुरुस्त्यांच्या निमित्ताने मुस्लिमांसारख्या सर्वांत मोठ्या अल्पसंख्याक समूहाचा मताधिकारच प्रत्यक्षात हिरावून घेतल्यासारखी परिस्थिती झाली. हाच उद्देश या उपक्रमामागे होता, असं तुम्हाला वाटतं का?

– मला निंदानालस्ती करायची नाहीये, कारण ते अगदीच उबगवाणं होऊन जातं. पण निवडणूक आयोगाच्या वर्तनाबद्दल खूपच शंका येण्यासारखी परिस्थिती आहे. हे केवळ मुस्लीमच म्हणतायंत असं नाही, तर इतरही लोक उघडपणे याबद्दल वारंवार बोलत आहेत. सर्वोच्च न्यायालयात, तसंच वृत्तपत्रांमध्ये याबद्दल बोललं जातं आहे. मतदारयाद्यांमधील दुरुस्त्यांचा उपक्रम अन्याय्य, विषमतापूर्ण आणि स्पष्टपणे मुस्लीम मतदारांचं नुकसान करणारा आहे.

प्रश्न – आसाममध्ये मुस्लीम मतदारांमुळे निवडणुकीच्या निकालावर ठळक परिणाम होईल अशा मतदारसंघांची संख्या मोठ्या प्रमाणात कमी करण्यासाठी परिसीमनाचा उपक्रम वापरला गेला, असं योगेंद्र यादव यांनी म्हटलं आहे. हाच या उपक्रमामागचा छुपा, पण खरा उद्देश होता, असं तुम्हाला वाटतं का?

– आसामच्या संदर्भात हे अगदीच उघड आहे. आत्ताच नव्हे तर गेली काही वर्षं तिथले मुख्यमंत्री श्री. शर्मा यांनी त्यांचे हेतू स्पष्ट केले आहेत. त्यामुळे तिथल्या मतदारसंघ पुनर्रचनेबाबत हा मुद्दा अगदीच स्पष्ट आहे. तिथे विरोधकांना मिळालेल्या सुमारे 25 जागांपैकी 23 जागांवर मुस्लीम उमेदवार निवडून आले आहेत. हे मतदारसंघ पुनर्रचनेमुळेच घडलं. देशभरात अशी पुनर्रचना केल्यावर काय होईल, याबद्दल आपण जाहीरपणे बोलण्याची गरज आहे. संसदेत यावर सविस्तर वादचर्चा झाली, पण त्यात केवळ विविध राज्यांमध्ये मतदारसंघांची संख्या कशी कमी होईल आणि कशी वाढेल, याबद्दलच बोलणं झालं. मला वाटतं, या पुनर्रचनेमुळे मुस्लीम, ख्रिश्चन व शीख, इत्यादी लोकसमूह – जे भाजपला मतदान करत नाहीत असं साधारणपणे मानलं जातं – बिनमहत्त्वाच्या भागांमध्ये केंद्रित केले जातील. ही अत्यंत चिंतेची बाब आहे.

प्रश्न – मतदारसंघ पुनर्रचनेचा उपक्रम देशभरात राबवला जाईल तेव्हा, मुस्लिमांचा निवडणुकांवर प्रभाव टाकण्याचा मार्गच मर्यादित केला जाईल, असं तुम्ही म्हणताय. मतदारसंघांचं विभाजन अन्याय्य रितीने केलं जाईल. आसाममध्ये नुकतंच हे घडल्याचं पाहायला मिळालं.

– होय, तसंच. आसामचा दाखला अगदी सुस्पष्ट आहे. आधीसुद्धा मतदारसंघ पुनर्रचनेमध्ये अशा प्रकारे अन्याय्य विभाजन झालं आहे. 1970 च्या दशकारंभी भोपाळमध्ये असं घडलं होतं. तिथे शकीर अली नावाचा उमेदवार स्पष्ट बहुमत मिळवून विजयी होत असे. त्यानंतर तो विजयी होऊ नये अशा रितीने मतदारसंघाचं विभाजन करण्यात आलं. थोडक्यात, राज्य सरकारांनी आणि केंद्र सरकारने यापूर्वीही स्वतःच्या सोयीचे निकाल लागावेत याकरता या उपक्रमाचा वापर केला आहे. एकाच पक्षाचा लाभ व्हावा यासाठी असा उपक्रम अखिल भारतीय पातळीवर राबवला गेल्यावर हेच घडेल. सांप्रदायिक किंवा संकुचित पातळीवर हे परिणाम दिसतात.

प्रश्न – आसाम आणि बंगाल निवडणुकांबाबत आणखी एक प्रश्न विचारतो. या दोन्ही राज्यांमध्ये भाजपला दोन तृतीयांश बहुमत मिळालं. पण दोन्ही ठिकाणी त्यांनी एकही मुस्लीम उमेदवार उभा केला नाही. याआधी उत्तर प्रदेश, बिहार व गुजरात इथेसुद्धा त्यांनी हेच केलं. पण त्या राज्यांमध्ये मुस्लीम लोकसंख्येचं प्रमाण तुलनेने कमी होतं. आता मात्र देशातील सर्वाधिक मुस्लीम लोकसंख्या असलेल्या दोन राज्यांमध्ये हे करण्यात आलंय. याकडे तुम्ही कसं बघता?

– हेही स्वाभाविकच होतं. मुस्लिमांना राजकीयदृष्ट्या परिघावर ढकलणं, हा भाजपचा हेतू आहे. निवडणुका जिंकण्यासाठी देशाचं ध्रुवीकरण साधणं, शक्य तितकी दुफळी माजवणं, हे भाजपचं खास सूत्र आपण लक्षात घ्यायला हवं. त्यामुळे हा एका मोठ्या योजनेचा भाग आहे. आम्हाला तुमची (मुस्लिमांची)

Date of Posting : 18-5-2026
More Newspaper and Magazines Telegram Channel join Search https://t.me/Magazines_8890050582 (Mob_+918890050582)

फिकीर नाही हे सूचित करणं, विविध आरोप करणं, यातून ते ध्रुवीकरणाचे लाभ उपटत राहतात. एकही मुस्लीम उमेदवार उभा न करण्याचं भाजपचं धोरण आसाममध्ये आणि बंगालमध्ये आपल्याला दिसलं. इतरही राज्यांमध्ये ते दिसेल. तुम्ही आम्हाला मत देत नसाल तर आम्ही तुम्हाला उमदेवारी का देऊ, असा प्रश्न त्यांच्या कृतीतून सूचित होतो.

प्रश्न – आसाममध्ये विरोधकांचे 24 उमेदवार निवडून आले, त्यांपैकी 22 मुस्लीम आहेत. बंगालमध्ये विजय मिळालेल्या 40 मुस्लीम उमेदवारांपैकी 34 तृणमूल काँग्रेसचे आहेत. मोदींच्या नेतृत्वाखालील भाजपला मुस्लीम आमदार–खासदार नको आहेत आणि विरोधकांच्या फळीत मुस्लीम लोकप्रतिनिधी वाढल्याचा त्यांना आनंदच होतो, कारण 'आम्हाला मुस्लिमांची फिकीर नाही' हा संदेश त्यातून दिला जातो. असं म्हणता येईल का?

– अर्थातच. ते स्वतःच्या अनुयायांना हाच संदेश देत आहेत. या संदेशाद्वारे आपल्या अनुयायांची संख्या वाढेल, अशी त्यांची अपेक्षा आहे. एकीकडे मुस्लीम समुदायाला परिघावर ढकलायचं, आणि दुसरीकडे तुम्हाला मतदान करत राहिलेल्या लोकांना खूश ठेवायचं. बेरोजगारी असो, किंवा देशासमोरचे इतर कोणतेही प्रश्न असोत, त्याचा विचार न करता हे मतदार तुम्हाला केवळ दुसऱ्या समुदायाबद्दलच्या अप्रीतीमुळे मतदान करत राहतील, अशी धारणा यामागे आहे. मला इथे द्वेष असा शब्द वापरायची इच्छा नाही. तो घृणास्पद शब्द आहे. लोकांमध्ये अगदी खोलवर जाणारी अप्रीतीची भावना निर्माण केली जाते, असं दिसतं. अगदी घरोघरी हे दिसतं, खेडोपाडी दिसतं, शहरांमध्येही दिसतं. आपण 'विकसित भारता'चा विचार करण्याऐवजी देशाच्या विभाजनासाठी काम करतो आहोत, ही लाजिरवाणी बाब आहे.

प्रश्न – तुम्ही अतिशय महत्त्वाची गोष्ट मांडताय.

Date of Posting : 18-5-2026
More Newspaper and Magazines Telegram Channel join Search https://t.me/Magazines_8890050582 (Mob_+918890050582)

थोडं मधेच थांबवलं तुम्हाला त्याबद्दल माफ करा. भाजप मुस्लिमांविषयी जाणीवपूर्वक अप्रीतीची भावना निर्माण करतंय, केवळ निवडणुकांमध्ये, प्रचारमोहिमांमध्ये किंवा मतदानामध्येच नव्हे तर, घरोघरी, लोकांच्या संभाषणांमध्ये, वर्तनामध्ये हे दिसतंय, असं तुम्ही म्हणताय.

– होय, मुस्लीम–हिंदू यांच्यातलं विभाजन अनेक वर्षांपासून आहे. ते काही मागे सोडून देता येत नाही. ते आहेच आधीपासून. हिंदू आणि मुस्लीम लोक अनेक वर्षं एकत्र राहत असले तरी अनेक वर्षांपासून त्यांनी एकमेकांना वेगळंही ठेवल्याचं दिसतं. देशाची फाळणी झाली त्या दरम्यान, संविधान सभेचं कामकाज सुरू होत होतं तेव्हा, या विभाजनावर उपाय करायला हवा, याची आपल्याला जाणीव झाली. त्यामुळे संविधान सभेच्या बैठकांमध्ये हजर असणाऱ्या तीनशे लोकांनी – त्यातल्या दलित, मुस्लीम, शीख, हिंदू, सर्वांनीच – स्पष्ट केलं की, फाळणीमुळे आपण खूप दुखावले गेलो असलो तरी, भारताने निग्रहाने ऐक्य जपायला हवं. हे ऐक्य नेहरूंच्या मंत्रीमंडळात दिसून आलं. तिथे मौलाना आझाद होते, तिवारी होते, तसंच सैय्यद महमूदही होते. आता मात्र ही धारणा संपली आहे. आपल्याला मुस्लिमांची गरज नाही, असा संदेश आताचे सत्ताधारी देत आहेत. तुम्ही परिघावर तुम्हाला हवं तसं जगा, आम्ही आम्हाला हवं ते करायला मोकळे आहोत, असा संदेश ते मुस्लिमांना देत आहे. निवडणुका जिंकण्यासाठीचं हे सूत्र भाजपने शोधलं आहे.

प्रश्न – ‘आपल्याला मुस्लिमांची गरज नाही’, असा संदेश भाजप देतं आहे. केंद्रात किंवा भाजपशासित राज्यांमध्येसुद्धा एकही मुस्लीम मंत्री नाही. संसदेत भाजपचा एकही मुस्लीम खासदार नाही. स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच हे घडतंय. तुम्ही मुस्लीम व्यक्ती म्हणून याकडे कसं बघता?

– हे अगदीच दुखावणारं आहे. माझ्या अवतीभवती खूप जण दुःखीकष्टी झाल्याचं दिसतं. अनेक वर्षं निष्क्रिय आणि नेतृत्वहीन असणाऱ्या, शिक्षणात मागास झालेल्या, आर्थिक साहाय्याची आत्यंतिक निकड असलेल्या एका अतिशय मोठ्या समुदायाला परिघावर ढकलण्याचा प्रयत्न भाजपने चालवला आहे. हा प्रयत्न यशस्वीही झाल्याचं दिसतं. याकडे कसं पाहायचं? आपला देश या परिस्थितीकडे न पाहता प्रत्येक निवडणुकीत हिंदू–मुस्लीम विरोधाच्या मुद्द्यावर स्वार होतो, हे दुःखद आहे. केवळ आपल्यापुरतंच नव्हे तर आंतरराष्ट्रीयदृष्ट्या विचार केला तरीसुद्धा हे वेदनादायी आहे.

प्रश्न – एकेकाळी भारतामध्ये राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, गृह मंत्री व परराष्ट्र कामकाज मंत्री, या पदांवर मुस्लीम व्यक्ती राहिल्या आहेत. तसंच, सशस्त्र दलं आणि गुप्तचर संस्थांचे प्रमुख म्हणूनही मुस्लिमांनी काम केलं आहे. आज मात्र कोणत्याही भारतीय राज्यात मुस्लीम मुख्यमंत्री नाही. काश्मीरमधील ओमर अब्दुल्ला राज्याची धुरा सांभाळत नाहीये. (तो आता केंद्रशासित प्रदेश आहे). अनेक राज्यांमध्ये, बहुधा 10–12 राज्यांमध्ये– एकही मुस्लीम मंत्री नाही. केवळ बिहारमध्ये मुस्लीम राज्यपाल आहे, आणि केंद्र सरकारच्या एकूण शंभर सचिवांपैकी केवळ एक मुस्लीम आहे आणि सर्वोच्च न्यायालयातील 32 न्यायाधीशांपैकी केवळ एक मुस्लीम आहे. मुस्लिमांना या देशाच्या सार्वजनिक जीवनातून बाजूला सारलं जातंय, असं यातून सूचित होतं का? केवळ राजकारणातून नव्हे तर देशाच्या सार्वजनिक जीवनातूनच त्यांना बाहेर ढकलण्याचं काम सुरू आहे का?

– खरं म्हणजे गेल्या दहा वर्षांपासून पद्धतशीरपणे हे घडतच आलं आहे. याचा दोष केवळ भाजपवर जातो असं नाही. मला वाटतं, मुसलमानांनीसुद्धा बरंच आत्मचिंतन करण्याची गरज आहे. त्यांच्या नेतृत्वाने त्यांची निराशा केली. सदासर्वकाळ फतवे काढणाऱ्या प्रतिगामी मागास मुल्ला मंडळींवर विसंबून राहिल्यामुळे हा समुदाय मागे पडला. इतर समुदाय त्यांच्याकडे साशंकतेने पाहू लागले. अशा वेळी दोन्ही बाजूंनी एकत्र बसून एकमेकांच्या उणिवा आणि सामर्थ्य यांचा विचार करायला हवा. मुस्लिमांविना भारताचं भलं होणार नाही. हिंदू आणि मुसलमान हे माझे दोन डोळे आहेत, असं गांधी म्हणाले होते. आपण पुन्हा एकदा मुळापासून विचार करून कुठे काय चुकलं ते शोधायला हवं. ही अप्रीतीची भावना का निर्माण झाली? हे सूत्र निवडणुका जिंकून देऊ शकतं, पण देशाला त्याची बरीच मोठी किंमत मोजावी लागेल.

प्रश्न – प्रतिगामी मुल्लांच्या प्रभावामुळे मुस्लीम

More Newspaper and Magazines Telegram Channel join Search https://t.me/Magazines_8890050582 (Mob_+918890050582)

मागास राहिले, यात काही शंका नाही. त्यांच्यावर अशा नेतृत्वामुळे मर्यादा येते. पण आज देशाच्या सार्वजनिक जीवनात कुठल्याही नेतृत्वस्थानी मुस्लीम व्यक्ती नाही. हे जाणीवपूर्वक करण्यात आलं आहे.

– भाजपला होकारात्मक कृतीच्या संकल्पनेचा पूर्णपणे विसर पडला आहे. त्यांनी अनुनय असा शब्द सातत्याने वापरला. आज हिंदू समाजमानसामध्ये अनुनय हा शब्द घट्ट रुतून बसला आहे. पण अनुनय म्हणजे काय? मला कोणताही अनुनय सुरू असल्याचं दिसत नाही. इतकी वर्षं तरी अनुनय सुरू होता का? सनदी सेवांमधील मुस्लिमांचं प्रतिनिधित्व कधीही तीन-चार टक्क्यांच्या वर गेलेलं नाही. वास्तविक, देशातील लोकसंख्येत त्यांचं प्रमाण 16 टक्के आहे. संसदेमधील मुस्लिमांचं प्रतिनिधित्व त्यांच्या प्रत्यक्ष लोकसंख्येतील प्रमाणानुसार कधीच राहिलेलं नाही. मौलाना आझादांसारखा मनुष्य निवडणुकीला उभा राहिला तेव्हाही त्याने रामपूर मतदारसंघ निवडला. मुस्लीम उमेदवार केवळ किशनगंज किंवा रामपूर इथूनच निवडून येतील, अशी मर्यादा पडल्यामुळे त्यांचं प्रमाण कमी होत गेलं. याचा दोष पक्षांकडेही जातो. धर्मनिरपेक्ष पक्ष हे तथाकथित धर्मनिरपेक्षता पाळतात, हे लक्षात घ्यायला हवं. भारतात पूर्णपणे धर्मनिरपेक्ष पक्ष आहे का? मला वाटतं, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचा अपवाद वगळता आणि काही मोजके नेते वगळता, या प्रश्नाचं उत्तर होकारात्मक देता येणार नाही. कदाचित राहुल गांधी धाडसीपणे तुम्ही टीव्हीवर बोलता तसं, किंवा आपण चर्चा करतोय तसं बोलतील. पण हे अपवादच. आपण उघडपणे काही बोललो, तर्कशुद्ध भाषेत बोललो, सर्व लोकांना सोबत घेण्यासंदर्भात काही बोललो, तर आता याउलट दिशेने विचार करू लागलेला मोठा लोकसमूह आपल्याला मतदान करणार नाही, अशी भीती राजकारण्यांच्या मनात असावी.

प्रश्न – या सगळ्याचा परिणाम काय झालाय, याबद्दल शेखर गुप्तांनी अलीकडेच 'बिझनेस स्टँडर्ड'मध्ये एक लेख लिहिला. त्यात ते म्हणतात की, मुस्लीम लोक सत्तारचनेच्या बाहेर फेकले गेलेत. मोदी-शहा यांच्या भाजपला 2019 मध्ये मुस्लीम जितपत महत्त्वाचे वाटत असतील तितकेही आता महत्त्वाचे वाटत नाहीत. तुम्हाला हा निष्कर्ष कितपत पटतो?

– मोदींच्या राजवटीला ते सत्तेत आले तेव्हापासून मुस्लीम महत्त्वाचे वाटतच नाहीत. याचा संबंध 2019 या वर्षाशी जोडणं अगदीच सौम्यपणाचं होईल. भाजप

More Newspaper and Magazines Telegram Channel join Search https://t.me/Magazines_8890050582 (Mob_+918890050582)

सत्तेत आला तेव्हापासूनच त्यांना सत्तेत टिकून राहण्याचा मार्ग लक्षात आला. आपण यशस्वी होण्यासाठीचा हा मार्ग स्वीकारला तर भविष्यात देशाला मोठी किंमत मोजावी लागेल, याचा विचार ते करत नाही. आज काय उपयोगी पडतंय, एवढाच विचार त्यांनी केला. मी अत्यंत अडचणींमधून सत्तेत आलो आहे, मला सत्तेत राहायचं आहे, मग त्यासाठी यशस्वी होण्याचं हे सूत्र माझ्याकडे आहे, तर मी ते वापरणार – अशी ही धारणा आहे. अशा यशासाठी त्यांनी दुफळी माजवली. या देशात 80 टक्के प्रमाणात असलेल्या लोकांपैकी अगदी 50 टक्क्यांनी मला मतदान केलं, तर 40 टक्के भारतीयांनी मला मतदान केल्यासारखं होईल, आणि तेवढं मला पुरेसं आहे. या सूत्रानुसार ते पुढे जात आहेत. त्यामुळे शेखर गुप्तांनी 2019 या वर्षापासून याची सुरुवात झाल्याचं म्हणणं म्हणजे भाजपला अगदीच सूट दिल्यासारखं होईल.

प्रश्न – भारतात मुस्लिमांची लोकसंख्या 15 टक्के आहे, म्हणजे सुमारे 20 कोटींच्या आसपास असेल. ही संख्या बरीच मोठी आहे. तर, सत्ताधारी पक्षाला त्यांची मतं महत्त्वाची वाटत नाहीत, सार्वजनिक जीवनातला त्यांचा सहभाग बराच कमी झाला आहे, या घडामोडींबद्दल तुमच्या परिचयातल्या, तुमच्या नात्यातल्या मुस्लिमांना, तुमच्या मित्रमंडळींना काय वाटतं? भाजप मुस्लिमांना विरोधकांपुरतंच मर्यादित ठरवतो आहे, आणि वाईट म्हणजे विरोधकही अनेकदा हिंदू मतं दुरावू नयेत यासाठी मुस्लिमांच्या हिताबद्दल बोलण्यापासून कचरताना दिसतात. याकडे मुस्लीम कसं पाहतात?

– तेच मी मगाशी म्हटलं. प्रत्येक जण कचरतो आहे. माझे मित्र तुमच्यासारखेच आहेत. माझे मित्र उदारमतवादी हिंदू आहेत, उदारमतवादी ख्रिश्चन आहेत. प्रामाणिकपणे सांगायचं तर, माझे मुस्लीम मित्र मोजकेच आहेत. त्यामुळे माझी पार्श्वभूमी तुमच्यासारखीच आहे. मुस्लिमांना परिघावर ढकललं जातं आहे, तसं व्हायला नको, ही चिंता तुमच्याप्रमाणेच मुस्लिमांना वाटते. हे खूप क्लेशकारक आहे.

प्रश्न – मुस्लीम दुय्यम दर्जाचे नागरिक ठरलेत, हे खरं आहे.

– हे बरंच कठोर विधान होईल. मला वाटतं...

प्रश्न – पण ते खरं आहे!

– मला वाटतं, यावर जरा विचार करायला हवा. मला वाटतं, राज्यसंस्था मुस्लिमांना ज्या तऱ्हेने वागवते आहे, त्यामुळे ते दुय्यम नागरिक ठरण्याच्या उंबरठ्यावर आहेत. मतदारसंघांची सोयीस्कर पुनर्रचना केल्यावर, ‘एक राष्ट्र, एक निवडणूक’ हे धोरण अंमलात आल्यावर यातून काय निपजेल, ते पाहावं लागेल. पण मुस्लीम लोक मोठ्या संकटात सापडतील, एवढं वाटतं. त्यांच्या समोरची परिस्थिती गंभीर आहे.

प्रश्न – मुस्लीम लोक दुय्यम दर्जाचे नागरिक ठरण्याच्या उंबरठ्यावर आहेत, असं तुम्ही म्हणालात. म्हणजे त्यांच्या समोर हा धोका आहे.

– होय, खरं आहे. आसाममध्ये आपण हे पाहिलं. तिथल्या मुख्यमंत्र्यांची विधानं हेच सांगणारी होती. बंगालमध्ये नवीन मुख्यमंत्र्यांनी केलेलं पहिलं विधानही हेच सांगणारं होतं. उत्तर प्रदेशातील श्री.योगी यांच्या विधानांमधून वारंवार हेच दिसत आलंय. प्रचारमोहिमांदरम्यान अनेक वरिष्ठ नेत्यांनी केलेली विधानं याच दिशेने जाणारी होती. तर हे चक्र फिरायला लागलंय, आता ते कुठपर्यंत जाईल, ते इतिहासालाच ठाऊक!

प्रश्न – मुस्लिमांना पाकिस्तानात जायला सांगितलं जातं, तेव्हा त्यांना कसं वाटतं? त्यांनी जाणतेपणाने भारतात राहायची निवड केली, 1947 मध्ये त्यांनी पाकिस्तानात न जाण्याचा निर्णय घेतला. आता, 2025, 2026 साली त्यांना पाकिस्तानात जायला सांगितलं जातं. या वेळी त्यांना कसं वाटतं?

– त्यांना हे खूपच अपमानास्पद वाटतं. हे द्वेषातून आलेलं विधान आहे, असं त्यांना वाटतं. आधी मी अप्रीतीविषयी बोललो, तसं हे नाही. हा निव्वळ द्वेष आहे. मुस्लीम तरुण भारताशी पूर्णपणे बांधील आहेत. पन्नास वर्षांचा किंवा त्याहून कमी वयाचा कोणीही मनुष्य फाळणीदरम्यान जन्मलेला नाही. ते इथल्याच शाळांमध्ये शिकलेत. त्यांची लग्नं इथेच झाली आहेत. त्यांची मुलंबाळं इथे आहेत, नातवंडं इथे आहेत. त्यांच्या नोकऱ्या इथे आहेत. त्यामुळे पाकिस्तानात जाण्याचा काही प्रश्नच नाही. मी या मुद्द्यावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी दीर्घ काळापासून संवाद साधत आलो आहे. मुस्लिमांना पाकिस्तानात हाकलून देता येईल किंवा त्यांनी पाकिस्तानात जायला हवं, यावर संघातल्या वरिष्ठ

Date of Posting : 18-5-2026
More Newspaper and Magazines Telegram Channel join Search https://t.me/Magazines_8890050582 (Mob_+918890050582)

मंडळींचीही सहमती होताना दिसते. त्यांचं घर इथेच आहे. पण त्यांना कसं वागवलं जातं, त्यांना भारताचा भाग मानलं जातं का, त्यांना मुख्य प्रवाहात जागा आहे का, हे प्रश्न आहेत.

प्रश्न – मुस्लिमांनी पाकिस्तानात जावं, असं जाहीरपणे म्हणालेले लोक आज मोदी सरकारमध्ये मंत्री आहेत. हे अगदीच लाजिरवाणं आहे. पण सन्माननीय सर्वोच्च न्यायालयाने त्यांना निर्दोष ठरवलं, हे त्याहून लाजिरवाणं आहे.

– (आसामचे मुख्यमंत्री) हेमंत बिस्वा शर्मा यांच्या विरोधातल्या प्रकरणाची सुनावणी घेण्याबाबत सर्वोच्च न्यायालय इच्छुक नव्हतं, त्याबद्दल तुम्ही बोलत आहात. शर्मा यांनी मुस्लिमांविषयी द्वेषमूलक विधानं केल्याचा आरोप होता. 'मियाँ मुस्लिमां'ना देश सोडून जाण्यासाठी भाग पाडण्याकरता त्यांना वाईट पद्धतीने वागवावं, अशा आशयाचं विधान त्यांनी केलं. सर्वोच्च न्यायालय या प्रकरणाची सुनावणी घेण्यासाठी इच्छुक नव्हतं. मी त्या प्रकरणातला एक याचिकाकर्ता होतो. आम्हाला ती विधानं खूप अस्वस्थ करून गेली. एखादा मुख्यमंत्री तरुण मुस्लिमांना लक्ष्य करतो, आणि सर्वोच्च न्यायालय मौन बाळगतं. हे सर्व कसं घडलं ते माझ्या आकलनापलीकडचं आहे.

प्रश्न – परिस्थिती किती खालावलेय, त्याचं हे एक चिन्ह आहे.

– हो, हे चिन्ह तर स्पष्टच आहे. सांविधानिक संस्था कोलमडून पडतात तेव्हा हे घडतं. निवडणूक आयोगाचंही हेच आहे. 'कॅग'ला अलीकडच्या काळात कधी काही करताना पाहिलं का? उच्च न्यायालयं आणि सर्वोच्च न्यायालय काय करत आहेत? मुस्लीम मोहल्ल्यांमध्ये स्थानिक पोलिसांचं वर्तन कसं असतं ते पाहा. आपण सर्वांनी या प्रश्नाचा विचार करायला हवा. हिंदू–मुस्लीम अशा द्विभाजनापुरतं हे पाहून चालणार नाही. तुमचा हा चॅनल पाहणाऱ्या सर्वांनी स्वतःच्या संदर्भात याचा विचार करायला हवा. अशा तिरस्काराच्या भावनेसह आपण या देशाला कुठे घेऊन चाललो आहोत.

प्रश्न – बरं, तर मुस्लिमांना त्यांचा राजकीय आवाज पुन्हा मिळवून देण्याची सुरुवात कशी करायची? की, हे करणं आता खूपच अवघड आहे, किंवा मोदींचा भाजप प्रभुत्वशाली राजकीय शक्ती म्हणून अस्तित्वात असेपर्यंत असं काही अशक्यच आहे?

– कोणताही पक्ष कायमस्वरूपी सत्तेत राहात नाही, असं इतिहास सांगतो. प्रत्येक गोष्टीची काहीएक आयुर्मर्यादा असते.

प्रश्न – कायमस्वरूपी नाही, पण अनेक दशकं तरी पक्ष सत्तेत राहू शकतो. काँग्रेसने जवळपास 40 वर्षं देशावर राज्य केलं. भाजपच्या बाबतीत असं घडलं आणि 40 वर्षं तो सत्तेत राहिला, तर बहुतांश लोकांसाठी ते कायमस्वरूपीच असेल.

– हो, 40 वर्षं हे सुरू राहिलं तर मी आणि तुम्ही हयात नसू. पण हे कधीतरी संपेलच, इतकंच मी म्हणतो आहे.

प्रश्न – भाजप सत्तेत असेपर्यंत मुस्लिमांना त्यांचा राजकीय आवाज परत मिळणार नाही, असं तुम्ही म्हणताय.

– तसं तरी, किंवा ध्रुवीकरण मर्यादा ओलांडू पाहतंय, त्यामुळे आता यांना सत्तेतून खाली खेचायला हवं, हे लोकांच्या कधी तरी लक्षात येईल. एकीकडे आपण बेरोजगारी पाहतोय, महागाई पाहतोय, सामाजिक सुरक्षिततेच्या प्रश्नांकडे पाहतोय.

प्रश्न – पण लोक सत्तापालटाची काही चिन्हं दाखवताना दिसत नाहीत.

– होय, आत्ता तरी तशी चिन्हं दिसत नाहीत. पण तामिळनाडूचं उदाहरण घ्या. मला वाटतं 'जेन झी' आता कृती करू लागलेय. विजयसारख्या तरुण नेत्याला इतकी मतं मिळणं, हे प्रस्थापित व्यवस्थेविषयी लोकांना वाटणाऱ्या तिटकाऱ्याचं चिन्ह आहे. नेपाळमध्येही आपण हे पाहिलं आहे.

प्रश्न – मोदींनी आखाती देशांशी खूप जवळचे संबंध राखले आहेत. विशेषतः सौदी अरेबिया व संयुक्त अरब अमिराती यांच्याशी घनिष्ठ संबंध निर्माण झालेत. त्या देशांकडून काही सूचक इशारा मिळाला तर भारतातील मुस्लिमांविषयीचा सत्ताधाऱ्यांचा दृष्टीकोन बदलेल का? की ते देश या गोष्टींची फिकीरच करणार नाहीत?

– तुम्ही हा प्रश्न विचारताय, याचं मला बरं वाटलं. हा एक ऐतिहासिक प्रश्न आहे. पॅन–इस्लामची एक चळवळ आहे. त्यात 'ग्रेट उम्माह' (जागतिक समुदाय) अशी एक कल्पना आहे. सर्व मुस्लिमांनी एकत्र राहावं. तर, 1400 वर्षांपूर्वी इस्लामच्या सीमा विस्तारत होत्या,

Date of Posting : 18-5-2026
More Newspaper and Magazines Telegram Channel join Search https://t.me/Magazines_8890050582 (Mob_+918890050582)

तेव्हा मुस्लीम विजय मिळवत होते, संस्कृतीचा, साहित्याचा गौरव होत होता, वगैरे. तेव्हा हा समुदाय आनंदात होता. इक्बालने या संदर्भात कविता लिहिल्या आहेत. पण हे एक अत्यंत मोठं मिथकच आहे. असा काही जागतिक समुदाय अस्तित्वात नाही. हे देश स्वतःच्या वेगवेगळ्या सीमा राखणारे आहेत. त्यांचे आपापले हितसंबंध आहेत. त्यामुळे पंतप्रधान मोदी संयुक्त अरब अमिरातीला जातात, तेव्हा ते मोदींना विचारतात, 'तुम्हाला आमच्याकडून काय हवंय?' मग मोदी त्यांना सांगतात, 'एक भव्य मंदिर बांधा.' तसं त्यांनी तिकडे एक भव्य मंदिर बांधलं आहे. संयुक्त अरब अमिरातीचे हितसंबंध विरुद्ध भारताचे हितसंबंध, असा हा प्रश्न आहे. सौदी अरेबियाबाबतसुद्धा तेच. ओमान आणि इतर सर्व राष्ट्रांबाबतसुद्धा तेच म्हणता येईल. त्यामुळे हे देश काही भारतीय मुस्लिमांचा कैवार घेणार नाहीत. या देशांची तशी काही भूमिका असती तर, पॅलेस्टाइनची अशी दुर्दशा झाली नसती.

तर, भारतीय मुसलमानांना स्वतःचं पुनरुत्थान घडवावं लागेल, स्वतःसाठी नवीन जगणं निर्माण करावं लागेल, शिक्षित नेतृत्व उभं करावं लागेल आणि हिंदूंना आपण त्यांचा भाग असल्याचं सांगावं लागेल. मुस्लिमांनी मुल्ला लोकांचं नेतृत्व सोडून द्यायला हवं, आधुनिक शिक्षण घ्यायला हवं. कृत्रिम बुद्धिमत्ता, कॉम्प्युटर, अर्थशास्त्र, इतिहास, या क्षेत्रांमध्ये मुस्लिमांनी प्रगती साधायला हवी. त्यांना याचीच गरज आहे.

प्रश्न – हे होत नाही तोपर्यंत भारतातील मुस्लिमांच्या परिघीकरणाबद्दल बोलणारी मंडळी पाश्चात्त्य माध्यमांमधलीच असतील. 'बीबीसी', 'द फायनान्शिअल टाइम्स', 'द इकॉनॉमिस्ट', 'द न्यूयॉर्क टाइम्स', 'द वॉशिंग्टन पोस्ट', कदाचित 'अल जझिरा', अशा माध्यमांबद्दल मी बोलतो आहे. मोदींना स्वतःच्या आंतरराष्ट्रीय प्रतिमेची प्रचंड काळजी आहे, पण ते पाश्चात्त्य माध्यमं काय बोलतायंत, याची फिकीर करतात का?

– पाश्चात्त्य माध्यमांना आपल्याविषयी काय वाटतं, याची मोदींना चांगलीच जाणीव असावी. न्यूयॉर्कने ममदानींना निवडून दिलं, तेव्हा त्या शहरवासीयांचं मोदींविषयी काय मत असेल, त्याची जाणीव मोदींना असणारच. पाश्चात्त्य देशांमध्ये इस्लामविषयी भयगंड असला तरी तिथे आपल्याविषयी कोणत्या भावना आहेत, हेही मोदींना ठाऊक आहे. पण हे काहीही असलं तरी मोदीत सत्तेत राहण्यासाठी आले आहेत, आणि त्यासाठीचं सूत्र ध्रुवीकरण हे आहे. अशा वेळी भावभावना बाजूला ठेवून ते पावलं उचलतात. सूत्राला घट्ट धरून राहतात. काहीही झालं तरी निवडणुका जिंकणं, एवढंच त्यांचं उद्दिष्ट असतं.

प्रश्न – म्हणजे नजीकच्या काळात या गोष्टींवर तोडगा दिसत नाही. भारतातील 20 कोटी मुस्लीम हे देशाला विसर पडलेला अल्पसंख्याक समूह झाले आहेत. राजकीयदृष्ट्या त्यांना महत्त्व दिलं जात नाही. सार्वजनिक जीवनात त्यांना महत्त्व उरलेलं नाही. त्यांचा विसर पडत चालला आहे.

– होय, खरंय. त्यांचा विसर पडलाय असं नाही, पण ते सध्या तरी मागे पडले आहेत, त्यांना चुकीची वागणूक मिळते आहे, एवढं खरं. हे क्लेशकारक आहे. यातून पुढे काय उद्भवेल, ते मी सांगू शकत नाही. पण या संदर्भात प्रत्येकाने आत्मचिंतन करायला हवं, हे मी पुन्हा सांगेन. सध्या केवळ उदारमतवादी समाज याबद्दल चिंता व्यक्त करतो आहे. पण भारतातील बराच मोठा घटक माथेफिरू झाला आहे, त्यात मुस्लिमांचाही समावेश होतो. हे आपल्यासाठी विनाशकारक ठरेल. आज शीख लोकही चिंतेत आहेत. मुस्लिमांचं भारतातलं प्रमाण किमान 20 टक्के तरी आहे, पण ख्रिश्चन केवळ 2 टक्के आहेत. त्यांची अवस्था पाहा. आदिवासी भागांमध्ये ख्रिस्ती लोकांसोबत काय होतंय ते पाहा. पोलीस त्यांचं रक्षण करताना दिसत नाहीत. तर, हा एक व्यापक प्रश्न आहे, आणि तसंच त्याकडे पाहायला हवं, रोज त्याबद्दल बोलायला हवं, लिहायला हवं.

प्रश्न – पण भारतात हे फारसं होताना दिसत नाही. ही दुःखद वस्तुस्थिती आहे. नजीब जंग, तुम्ही या मुलाखतीसाठी वेळ दिलात, याबद्दल धन्यवाद.

भाषांतर : प्रभाकर पानवलकर

10 मे 2026 रोजा झालेल्या या मुलाखतीचा 35 मिनिटांचा व्हिडिओ the wire वर उपलब्ध आहे.

More Newspaper and Magazines Telegram Channel join Search https://t.me/Magazines_8890050582 (Mob_+918890050582)